# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

सं. क्र. काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. २१/२०११-१२ दिनांक :

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. रंगराव नारायण माळी,<br>मु.पो. बेळोंखी, ता. जत, जि. सांगली. | अर्जदार |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १) | कार्यकारी अभिंयता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि. वितरण कंपनी मर्यादित,<br>सं व सु मंडळ कार्यालय, सांगली | विरुध्द पक्षकार |
| २) | कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली | |
| ३) | सहाय्यक अभियंता,<br>म,रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, जत, जि. सांगली | |

कोरम : १) श्री. बी.जी. पवार. अध्यक्ष,
२) श्री. जी.बी. पानकर, सदस्य सचिव
३) श्री. जी.सी. लेले. सदस्य

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्याय निर्णय**

श्री. बी.जी.पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. रंगराव नारायण माळी, मु.पो. बेळोंखी, ता. जत, जि. सांगली यांनी मंचाकडे अनुसूची अ मध्ये आपले प्रतिनिधी श्री. हरिभाऊ दि. खापरे यांजामार्फत महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ मधील कलम ६.१० नुसार वितरण कंपनी जत उप विभाग, कवठे महांकाळ विभाग विरुध्द तक्रार दि. २०.४.२०१२ रोजी दाखल केली. त्याचा तपशील खालील प्रमाणे -

This document was created using SmartPDFCreator. To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

तक्रारदार कै. नामदेव सदा माळी यांनी आपली बेळूंखी येथील शेत जमीन गट क्र. ४७२ मध्ये शेतीपंप चलन भरणेसाठी अर्ज केला होता. रु. ४३४५/- पावती क्र. ६७०४६७५ दि. ११.५.१९९९ रोजी त्यांच्या वारसदारांनी भरलेले आहेत. त्यापूर्वी सदर अर्जदार हे दि. ८.७.१९९८ रोजी मयत झाले आहेत. त्यांचे वारसदार यांनी नाव बदली प्रस्ताव व विद्युत पुरवठा मिळावा यासाठी सन १९९९ मध्ये अर्ज केला परंतु वि.प.ने नांव बदलले नाही व विद्युत पुरवठा केला नाही. वि.प.च्या दि. ९.९.२००४ च्या नोटीसीप्रमाणे वारसदार श्री. रंगराव नारायण माळी यांनी नाव बदली प्रस्ताव सादर करुन दि. २१.९.२००४ रोजी चाचणी अहवाल दिलेला आहे व कपॅसिटरही तपासून घेतलेला आहे. यानंतर लवकरच नांव बदली व वीज जोडणी देत असल्याचे सांगून मूळ अर्जदाराचे नांवे मीटर किंमत रु. २२५०/- दि. २४.९.२००४ रोजी भरुन घेतले आहेत. अर्जदार यांनी शाखा कार्यालय डफळापूर येथून सहा सिमेंट डांब वाहतूक केले परंतु हे डांब दुसऱ्या ग्राहकांना देण्यात आले व तक्रारदार यांना वीज पुरवठ्यापासून वंचित ठेवले आहे. त्यांना वितरण वाहिनीचा विस्तार जास्त आहे व यादीतून नांव कमी केल्याचे सांगण्यात आले. तक्रारदार ग्राहकाने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे दि. २७.१.२०१२ रोजी तक्रार दाखल केली. अंतर्गत कक्षाने कुठलेही आदेश पारीत केले नाहीत. मंचाकडून अपेक्षित मदत - बदली प्रस्ताव मंजूर करावा व वीज जोडणी त्वरित द्यावी असा आदेश मिळावा, भरुन घेतलेली मीटर रक्कम रु. २२५०/-, कपॅसिटर व ॲग्रीमेंट बॉंड रु. १००/- व रु. २०/- व्याजासह परत मिळावेत.

वितरण कंपनीने आपल्या दि. ७.५.२०१२ च्या लेखी अहवालात श्री. नामदेव सदा माळी यांचे नांवे दि. ११.५.१९९९ रोजी शेतीपंपासाठी वि.प.कडे चलन भरलेले आहे, ते दि. ८.७.१९९८ रोजी मयत झाले आहेत. तक्रारदार श्री. रंगराव नारायण माळी, रा. बेळोंखी हे जमिनीचे वारसदार आहेत. त्यांनी रितसर कागदपत्रे सादर केलेनंतर त्यांचे नांवे वीज जोडणी देण्यात येईल. तरी नुकसान भरपाई मान्य करण्यात येवू नये असे म्हटले आहे. तसेच कृती मानके विनियम २००५ कलम १२.२ नुसार कृती मानकातील कमतरता दूर करण्यात आली नसल्यामुळे भरपाईचा कालावधी निश्चित होत नाही, त्यामुळे नुकसान भरपाई मान्य करण्यात येवू नये अशी विनंती केली आहे.

प्रस्तुतची तक्रार दि. १२.४.२०१२ ला मंचासमोर सुनावणीस घेतली असतां, तक्रारदार गैरहजर, प्रतिनिधी उपस्थित नाहीत. वि.प.तर्फे श्री. मैलापुरे, सहाय्यक अभियंता उपस्थित. त्यांनी तक्रारदार ग्राहकाचे नांव यादीतून कमी केले असल्याचे सांगितले. डी-१ अहवाल तपासून सविस्तर अहवाल दि. ३१.५.२०१२ पर्यंत देण्याचे मंचासमोर मान्य केले. परंतु दि. ४.६.२०१२ पर्यंत कुठलीही कागदपत्रे वि.प.ने मंचासमोर हजर केली नाहीत.

खालील मुद्दे निर्णयासाठी उपस्थित होत आहेत.

१) तक्रारदार ग्राहकाने मागणी केल्याप्रमाणे मिटरची रक्कम रु. २२५०/-, कपॅसिटर व ॲग्रीमेंट बॉंड रु. १००/- व रु. २०/- असे एकूण रु. २३७०/- व्याजासह मंजूर करणे योग्य होईल काय ?

उत्तर : रु. २३७०/- वितरण कंपनीने ग्राहकास त्वरित परत द्यावेत. अर्जदाराची व्याजाची माफी फेटाळण्यात येत आहे.

This document was created using Smart PDF Creator. To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

२) ग्राहकाने मागणी केल्याप्रमाणे वीज जोडणी त्वरित द्यावी असे वि.प.ला आदेश करणे योग्य होईल काय ?

उत्तर : होय

## कारणमिमांसा

वितरण कंपनीने आपल्या लेखी अहवालात किंवा वि.प.चे फिल्ड ऑफीसर श्री. मैलापुरे यांनी मंचासमोर मिटरची रक्कम, कपॅसिटर फी व अॅग्रीमेंट बाँड या बाबत मंचासमोर कुठलेही म्हणणे सादर केले नाही. मा. आयोगाने मंजूर केलेले शेड्यूल ऑफ चार्जेस नुसार वितरण कंपनीला अशा रकमा ग्राहकाकडून घेता येणार नाहीत. ही गोष्ट लक्षात घेऊन ग्राहकाची परताव्याची मागणी मंजूर करणे योग्य होईल. व्याजाच्या मागणीबाब कुठलेही संयुक्तिक कारण वाटत नाही असे मंचाचे मत आहे, कारण अर्जदार दि. ८.७.१९९८ रोजी मयत झाले आहेत व दि. ११.५.१९९९ रोजी वारसदार यांनी चलनाचे पैसे भरले आहेत, परंतु मीटर किंमत रु. २२५०/- दि. २४.९.२००४ रोजी भरली आहे. दि. २१.९.२००४ रोजी कपॅसिटर तपासून घेतला आहे व त्याचदिवशी तक्रारीत म्हटल्याप्रमाणे सदरचे ग्राहक तक्रारदार श्री. रंगराव नारायण माळी यांनी नांव बदली प्रस्ताव सादर केला. ग्राहकाने आपल्या तक्रारीत वारस प्रक्रीया दि. ८.३.१९९९ ला पूर्ण करण्यात आली असे म्हटले आहे. या उलट वि.प.ने तक्रारदार ग्राहक जमिनीचे वारसदार आहेत या बाबत रितसर कागदपत्रे सादर केलेनंतर त्यांचे नांवे वीज जोडणी देण्यात येईल असे म्हटले आहे. थोडक्यात, अर्जदार ग्राहक श्री. रंगराव नारायण माळी यांनी वारसदार म्हणून केलेल्या मागणीबद्दल संभ्रम / वाद उत्पन्न होण्याची शक्यता आहे, म्हणूनच वि.प.ने नांव बदली प्रस्ताव प्रलंबित ठेवला आहे असे अनुमान काढता येईल. तक्रारदाराने दि. २४.९.२००४ रोजी मिटरचे पैसे भरले आहेत व अंतर्गत कक्षाकडे दि. २७.१.२०१२ रोजी गाऱ्हाणे दाखल करुन मंचाकडे दि.२०.४.२०१२ रोजी गाऱ्हाणे दाखल केले आहे. अशा परिस्थितीत, व्याजाची मागणी मंजूर करणे योग्य होणार नाही असे मंचाचे मत आहे. मुद्दा क्र. १ चे उत्तर होय असे देण्यात येत आहे. वि.प.ने मिटरची रक्कम रु. २२५०/-, कपॅसिटर व अॅग्रीमेंट बाँड रु. १००/- व रु. २०/- असे एकूण रु. २३७०/- त्वरित द्यावेत असे आदेश देणे योग्य होईल. ग्राहकाने नांव बदली प्रस्ताव वि.प.कडे प्रलंबित असल्याने मंजूर करावी अशी मंचाकडे मागणी केली आहे. वि.प.ने आपल्या लेखी अहवालात तक्रारदार ग्राहक हे जमिनीचे वारस असल्याबाबतची कागदपत्रे द्यावीत अशी मागणी केली आहे. ग्राहकाने आपल्या तक्रारीत मूळ अर्जात कै. नामदेव सदा माळी यांना कोणी वारस नसल्याने आपले पूतणे श्री. रंगराव नारायण माळी यांचे नांवे जमिनीचे बक्षीसपत्र केले आहे, त्यानुसार तक्रारदार ग्राहकाचे नांव वारस म्हणून लागले असे नमूद केले आहे. ग्राहकाने अशी कागदपत्रे वि.प.कडे त्वरित दाखल करावीत व वि.प.ने तक्रारदार ग्राहकाचा नाव बदली प्रस्ताव त्वरित मंजूर करावा असे आदेश करणे योग्य होईल.

This document was created using Smart PDF Creator. To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

ग्राहकाची वीज जोडणी त्वरित द्यावी या मागणीबाबत, वि.प.चा लेखी अहवाल पहातां, रितसर कागदपत्रे दाखल केल्यानंतर वीज जोडणी देण्यात येईल असे म्हटले आहे. विद्युत कायदा २००३ कलम ४३ व मा. आयोगाने मंजूर केलेली कृती मानके विनियम, सप्लाय कोड या अधिनियमानुसार ग्राहकाला वि.प.ने वीज जोडणी देणे आवश्यक आहे. ग्राहकाच्या म्हणण्यानुसार शाखा कार्यालय डफळापूर येथून सहा सिमेंट डांब वाहतूक केले परंतु हे डांब दुसऱ्या ग्राहकांना देण्यात आले यावर वि.प.ने आपल्या लेखी अहवालात कुठलाही खुलासा केला नाही. ग्राहकाला वितरण वाहिनीचा विस्तार जास्त आहे व यादीतून नांव कमी केल्याचे सांगितले याबाबत श्री. मैलापुरे यांनी दि. १२.४.२०१२ ला मंचासमोर सविस्तर अहवाल दि. ३०.५.२०१२ पर्यंत दाखल करतो असे सांगितले, परंतु लेखी अहवालात याबद्दल कुठलेही स्पष्टीकरण नाही, नांव कमी केले, नोटीस दिली आहे असा बचाव घेतला नाही. वितरण वाहिनीचा विस्तार जास्त आहे या कारणावरुन ग्राहकाची वीज जोडणीची मागणी फेटाळली जावू शकत नाही. ग्राहकाचे नांव कमी केले असले तरी ग्राहकास वीज जोडणी देणे आवश्यक आहे. ग्राहकाचा कॅपॅसिटर सप्टेंबर २००४ मध्ये तपासून घेतला, चाचणी अहवाल स्वीकारला, मिटरची रक्कम सप्टेंबर २००४ मध्ये भरुन घेतली. ग्राहकाच्या म्हणण्यानुसार त्याने ६ डांबांची वाहतूक केली, परंतु हे डांब दुसऱ्या ग्राहकांना देण्यात आले. याबाबत वि.प.ने स्पष्टीकरण दिले नाही किंवा तांत्रिक अडचण मंचासमोर सांगितली नाही. त्यामुळे ग्राहकाने मागणी केल्याप्रमाणे त्वरित वीज जोडणी देण्याचे आदेश करणे योग्य होईल असे मंचाचे मत आहे. ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल विनियम २००५ कलम ८.२ नुसार मंच ग्राहकाचे गाऱ्हाणे ठराविक मुदतीत दूर करण्याचे आदेश वि.प.ला देऊ शकतो. मयत अर्जदार व तक्रारदार वारस श्री. रंगराव नारायण माळी यांनी वेळोवेळी पूर्तता करुनही वीज जोडणीपासून त्यांना वंचित ठेवले आहे. त्यामुळे दि. ३१.७.२०१२ पर्यंत ग्राहकास वीज जोडणी देण्याचे आदेश करणे योग्य होईल असे मंचाचे मत झाले आहे. मुद्दा क्र. २ चे उत्तर होय असे देण्यात येत आहे.खालील प्रमाणे आदेश -

## <u>आदेश</u>

१) तक्रार मंजूर करण्यात येत आहे.

२) वितरण कंपनी जत उप विभाग, कवठे महांकाळ विभाग यांनी तक्रारदार ग्राहकास २३७०/- त्वरित परत द्यावेत . ग्राहकाची व्याजाची मागणी फेटाळण्यात येत आहे.

३) वितरण कंपनी जत उप विभाग, कवठे महांका ळ विभाग यांनी अर्जदार ग्राहकाचा नाव बदली प्रस्ताव त्वरित मंजूर करावा व त्यांस दि. ३१.७.२०१२ (अेकतीस जुलै दोन हजार बारा) पर्यंत वीज जोडणी द्यावी व त्याचा अहवाल मंचास द्यावा.

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

५) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखे-पासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

दिनांक : ( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी. बी. पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com